**MAHARASHTRA ACT No. XXI OF 1983**

**THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) (EXTENSION OF DURATION) ACT, 1983**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १३ एप्रिल १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम्. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

**MAHARASHTRA ACT No. XXI OF 1983**

**AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) ACT, 1980**

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १५ एप्रिल १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

**सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१**

**महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याची मुदत वाढविण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९८० चा महा. १६. १९८३ चा महा. अध्या. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याची मुदत वाढविण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झालेली होती; म्हणून त्यांनी, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत वाढविणे) अध्यादेश, १९८३ हा दिनांक ५ मार्च १९८३ रोजी प्रख्यापित केला ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे आता राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत वाढविणे) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक ५ मार्च १९८३ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम १६ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १, पोट-कलम (३) मध्ये "३१ मार्च १९८३" या मजकुराऐवजी "३० सप्टेंबर १९८३" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९८० चा महा. १६.

सन १९८३ चा महा. अध्यादेश ६ चे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत वाढविणे) अध्यादेश, १९८३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८३ चा महा. अध्या. ६.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे केलेली यथास्थिती गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.